माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्र. MHSICMU/२०२६/M/०००१०१

अपिलार्थी श्री. राकेश नारायण गुरव

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सहकारी अधिकारी (के/पूर्व विभाग)
सहकार कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई-५१

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था पूर्व/पश्चिम उपनगरे, सहकार कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई-५१

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.१०.२०२६

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

मूळ अर्ज दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक	प्रथम अपील दिनांक	प्रथम अपील आदेश दिनांक
१५.०१.२०२५	२७.०१.२०२५	१८.०३.२०२५	०१.०७.२०२६

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०७.०१.२०२६ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २७.०१.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. १५.०१.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"सदर विषयातील दिलेल्या माहिती नुसार योजने संबंधीत वर्ष २०१९ पासून ते २०२५ जानेवारी आजपर्यंत किंवा माहिती मिळेपर्यंत सदर सहकार कक्ष कार्यालयात महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र सुधारणा, निर्मुलन व पुनर्पसन अधिनियम १९७१ मधील कलम ३(ई) नुसार व झोपुप्रा परिपत्रक क्र. १४५ दि.२४.१०.२०१३ अन्वये सदर पुनर्वसन योजनेतील आज पर्यंत २०२५ सदनिका व गाळ्यांचे हस्तांतरण प्रक्रियेसाठी प्राप्त झालेल्या अर्जाची व पारित केलेल्या सदनिका हस्तांतरण प्रमाणपत्राची आदेशाची संपूर्ण अभिलेखाची माहिती द्यावी."*

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.०१.२०२५ रोजी अपिलार्थींना कळविले की, सदनिका हस्तांतरणाच्या पत्रामध्ये तसेच धारीकेमध्ये संबंधीत व्यक्तींचे आधार कार्ड, पॅन कार्ड तसेच आयकर रिटर्न व इतर वैयक्तीक माहितीचा समावेश असतो. तरी आपण मागणी केलेली माहिती ही त्रयस्त पक्षाची माहिती असल्याने तसेच सदर माहिती मागण्यामध्ये कोणतेही व्यापक जनहित असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील ७ (७) व कलम ११ अन्वये उपलब्ध करून देता

..२/-

येत नाही. तसेच आपण मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असल्याने संबंधितांना तशी नोटिस देऊन त्यांचे म्हणणे विचारात घेऊन निर्णय घेणे शक्य नसल्याने वर नमुद केलेली माहिती आपणांस पुरविता येत नाही.

अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १८.०३.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना माहिती अर्जातील मुद्दा क्र. २ अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र सुधारणा, निर्मुलन व पुनर्वसन अधिनियम, १९६१ चे कलम ३(ई) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परि- १४५ तरतुदीनुसार झालेली सदनिका हस्तांतरणाची संपूर्ण माहिती हवी आहे. त्यांनी नमुद केले की, ते ज्या संस्थेत राहतात त्या संस्थेकडे माहिती नसल्याने त्यांचे संस्थेत राहणारे लोक अधिकृत आहेत कि अनधिकृत आहेत हे समजण्यासाठी माहिती मागितली होती. जी की, त्यांना नाकारण्यात आलेली आहे.

६. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीचे लेखी निवेदन दि. १२.१०.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपिलार्थींना विहित मुदतीत उत्तर दिले की, मागितलेली सदनिका हस्तांतरण विषयी माहिती संबंधीतांची वैयक्तिक माहिती असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(छ) व कलम ११ नुसार देता येणार नाही. तसेच, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

७. जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई खंडपीठ यांचे अपील क्र. ०२१८/२०२३, मध्ये दि. १८.०७.२०२३ रोजी दिलेले निकालाची प्रत सादर करुन नमुद केले की, अशाच प्रकारचे प्रकरणात राज्य माहिती आयोगाने विचारलेली माहिती खरेदी/ विक्रीची माहिती त्रयस्थ व्यक्तीस देणे योग्य नाही असे नमुद करुन अपील निकाली काढलेले आहे. त्यांनी नमुद केले की, जेव्हा त्यांच्या कार्यालयाकडून सदनिका हस्तांतरणाची परवानगी दिली जाते, त्याची एक प्रत संस्थेस देण्यात येते व अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती संकलित स्वरुपात उपलब्ध नाही.

८. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली भुमिका योग्य आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission ★ Greater Mumbai ★

मुंबई
दिनांक : १५.१०.२०२६

15-10-2026
(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई